ललिता गंडभीर
LALITA GANDBHIR
4200 N.OCEAN DRIVE,1501-2
RIVIERA BEACH
FL 33404
USA.

# सुलीचा निर्णय

सुलीचा, सुलोचनाचा नाईलाज झाला होता म्हणून तिने जॅनेटच्या न्यू इयर इव्ह पार्टीचं आमंत्रण स्वीकारलं. सुलीच्या जीवनात जे काही घडत होतं ते जॅनेटच्या कानापर्यंत पोचलं होतं का नव्हतं हे सुलीला माहिती नव्हतं. पण जॅनेटला ती ओळखत होती. हॉस्पिटलच्या गॉसिप व राजकारणापासून जॅनेट अलिप्त होती. ती चालवत असलेल्या नर्सरी स्कूलमध्ये व घरकामात ती गुरफटलेली असे.

"कुणाच्या अध्यात मध्यात पडायचं नाही," हे तिचं तत्व होतं. सुलीच्या घराजवळच ती राहात होती. सुलीचा पती मदन, वुडलंड या गावात ऑर्थोपेडीक सर्जन म्हणून प्रॅक्टीस करू लागल्यापासून सुलीची व जॅनेटची मैत्री होती. म्हणून सुली पार्टीला जाणार होती. .

सुलीने पार्टीला जाण्यासाठी मेकअपचा हलकासा थर लावला. निळा पंजाबी ड्रेस घातला व स्वत:ला आरशात निरखून पाहिलं.

खांद्यापर्यंत रुळणाऱ्या केसात एखादी रुपेरी रेषा, बदामी चेहरा, हरणासारखे डोळे, कमानदार भुवया, भरीव ओठ, सरळ नाक, सडपातळ बांधा. अजून तिशीतली दिसणारी सुली सुंदर होती. पूर्वी, "तू खूप सुंदर आहेस," असं तिच्या मैत्रिणी तिला म्हणायच्या. पण आता तिला त्याचा विसर पडला होता.

"ऐन विशीतल्या मिकीशी स्पर्धा करण मला अशक्य आहे," असा विचार तिच्या मनात येऊन गेला. तिने तो मनापासून झटकून टाकला. तिला स्पर्धा नकोच होती.

मदन हॉस्पिटलमधून परस्पर ह्या पार्टीला जाणार होता. तिला एकटीलाच ह्या पार्टीला जायचं होतं आणि पार्टीत जे काही घडेल त्याला तोंड द्यायचं होतं.

वुडलंडमध्ये प्रॅक्टीस करणारे सगळे डॉक्टर आळीपाळीने न्यू इयर इव्हची पार्टी करायचे. ह्या वर्षी डॉ. रॉजर व त्याची पत्नी जॅनेट ह्यांची पार्टी करण्याची पाळी होती. ह्या पार्टीला सगळे डॉक्टर, त्यांच्या सेक्रेटरी व ऑफिस स्टाफला आमंत्रण देण्याची पद्धत होती. थोड्क्यात, मिकी तिथे असणार होती. ह्या पार्टीत मिकीला स्वत:च्या सौंदर्याचं प्रदर्शन करण्याची संधी मिळणार होती.

स्वत:चं रूप, गोल चेहरा, हसल्यावर गालावर पडणारी खळी, अपरं नाक, लालसर केस, हिरवे डोळे, आणि सडपातळ बांधा हे खुलवण्याची कला मिकीला अवगत होती.

चार वर्षापूर्वी मदनची सेक्रेटरी नोकरी सोडून गेली होती आणि तिच्या जागी मदनने मिकीला सेक्रेटरी म्हणून नेमली होती.

मिकीला प्रथम सुलीने पाहिलं तेव्हा ती मदनला म्हणाली होती, "ही मेनका तुझ्या डोळ्यासमोर रात्रंदिवस असताना माझं काय होणार?"

मदन दिलखुलास हसत म्हणाला होता, "माझा माझ्या उर्वशीवर ती अठरा वर्षाची असल्यापासून डोळा होता. अग तुला मागणी घालून तुझ्याशी लग्न केलय मी! मी विश्र्वामित्र नाही. तू काळजी करू नकोस."

आणि खरचं सुलीने काळजी केली नव्हती. दोन वर्ष मिकीबद्दल व मदनबद्दल अफवा कानावर येत होत्या पण त्यांच्याकडे तिने दुर्लक्ष केलं होतं.

अखेर शेवटी एक दिवस प्रभी तिला भेटायला आली होती. ती म्हणाली होती, "सुले जागी हो. हॉस्पिटलच्या वातावरणात डॉक्टर, सेक्रेटरी व नर्सेस यांचा निकटचा सहवास होतो. परिणामी त्यांची अफेअर्स होतात. तरुण सेक्रेटरीसमोर, नर्सेस समोर; बायको फिकी वाटू लागते. अशी वुडलंडच्या हॉस्पिटलात झालेली अफेअर्स तुला माहिती आहेत. काही तिथेच संपतात, काहींचा अंत डॉक्टरच्या डिव्होर्समध्ये होतो. मिकीमदनचं काय होणार आहे कोण जाणे?. मला तुझी काळजी वाटते. तुझी करियर तू चुलीत घातलीस. डिव्होर्स झाला तर तुला अलीमोनीवरच अवलंबून रहाव लागेल. तसं व्हायला नको."

"माझ्या मदनवर माझा विश्वास आहे." सुलीने सांगितले.

"अख्या जगाला मिकी मदनच काय चाललंय हे दिसतंय! तू तर डोळे मिटून घेतलेस. एक सुचवते. तू टीचर होतीस. परत कॉलेजात जा. टीचर हो. स्वावलंबी हो."

प्रभी सुलीची जीवश्र्चकंठ्श्र्च मैत्रिणी. ती बालरोगतज्ञ म्हणून वुडलंडच्या हॉस्पिटल मध्ये प्रॅक्टीस करू लागल्यापासून तिची आणि सुलीची मैत्री होती. सुलीने प्रभीची दोन मुलं लहान असताना तिला खूप मदत केली होती. प्रभीचा पती पुष्कळदा फिरतीवर असायचा. प्रभीला सिटर मिळत नसल्यास सुली तिची मुलं सांभाळायची." "तुझ्यामुळे मी प्रॅक्टीस करू शकले." असं प्रभी सुलीला नेहमी सांगायची. सुलीची मुलं शाळेत जाऊ लागल्यावर प्रभी तिला, "तू आता स्वत:च्या करियरसाठी काहीतरी हालचाल कर. कॉलेजात जा. प्रत्येक स्त्रीला आपली स्वत:ची अशी आवक असायला पाहिजे," असं म्हणत होती.

पण मदनने तिच्या परत कॉलेजात जाण्याच्या कल्पनेला विरोध केला होता. "आपल्याला पैश्याची जरुरी नाही. तू हवं तर व्हॉलेंटीयरचं काम कर. शिवाय तू कॉलेजात जायला लागलीस तर मस्त जेवण कोण करणार?" तो म्हणायचा.

मदनच्या विरोधामुळे सुली कॉलेजला जाण्याचा बेत पुढे ढकलत राहिली होती.

आतापर्यंत सुलीने कानावर पडणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवला नव्हता. पण प्रभीच्या स्पष्टवक्तेपणानंतर तिच्या मनात शंका येऊ लागल्या.

"का सरला म्हणते तसं प्रायव्हेट डिटेक्टिव्ह शोधावा ?"

कुठलाच मार्ग तिला योग्य वाटेना.

"या गावात मदनच्या मागे डिटेक्टिव्ह लावला तर ते गुप्त राहणार आहे का?"

एक दिवस सरला- तिची धाकटी मुलगी तिला हळूच म्हणाली, "मम्मी शाळेतली इतर डॉक्टरांची, नर्सेसची मुलं डॅडी आणि मिकी बद्दल बोलतात."

"तू त्यांच्यावर विश्वास ठेऊ नकोस." सुलीने मदनची बाजू घेतली.

"मम्मी तू डॅडीच्या मागे डिटेकटिव्ह लाव." सरला म्हणाली. "माझी बेस्ट फ्रेंड मेरी सुद्धा तसेच म्हणते. मेरी खोटं बोलणार नाही."

सुली हतबद्ध झाली!

प्रभीचा सल्ला घेऊन तिने कॉलेजला जायचं ठरवलं आणि मदनवर ती काळजीपूर्वक लक्ष ठेऊ लागली.

पण तिच्या मनाची शांती नष्ट झाली होती. तिच्या मनात सतत विचारचक्र चालू असे.

मदनला सरळ, "तुझं मिकीशी प्रेमप्रकरण आहे का?" अस विचारावं  का?

मदनाला "तुझं मिकीशी प्रेम प्रकरण आहे का?" असं विचारलं तर तो खरं बोलेल का? आणि त्यानं "आहे," म्हटलं तर आपण काय करायचं? त्याच्या पुढे दयेची भीक मागायची?" "ते शक्य नाही! ही सुली कधीही कुणाकडे कसलीही याचना करणार नाही."

विचार करून सुलीने निर्णय घेतला, 'मदनचं 'खरोखर मिकीवर प्रेम असेल तर त्याच्या मार्गातून ती दूर होणार.'

आर्थिक स्वातंत्र्यासाठी तिने कॉलेजात नाव नोंदवलं. आणि ती कॉलेजात कोर्सेस घेऊ लागली.

मदनला तिने,"मला घरात बसून कंटाळा येतो.मुलांना आता माझी जरुरी नाही. मी कॉलेजला जाते," असं सांगितलं.

त्याने नेहमीप्रमाणे "तुला आता शिक्षणाची काय जरुरी?" असं म्हटलं.

"मला जायची फार इच्छा आहे" असं तिने म्हणताच "तुझी इच्छा असेल तर तू जरूर जा" असं बोलून तिच्या बेताला संमती दिली.

आता मदनच्या हालचालीवर ती बारीक नजर ठेवू लागली.

तो परगावी एका मेडिकल मिटींगला परत जाऊन आल्यावर त्याच्या बॅगेतले कपडे काढताना तिला मिकीच्या नावाची रिसीट सापडली. ती तिने परत बॅगेत ठेवली.

दोन रात्री तिने रडून काढल्या आणि मदनपासून स्वत:हून वेगळं होण्याचा निर्णय घेतला.

ती मदनाला नकोशी झाली होती. त्याचं मन बदलण्याचा ती प्रयत्न करणार नव्हती. या वयात स्वताचा मार्ग शोधून तिला स्वतंत्र व्हायचं होतं.

त्या पार्टीला ती मुद्दाम उशिरा पोचली. तिला पाहताच प्रभी धावत आली. पार्टी चालू असे पर्यंत प्रभी आपल्याला एकटी  सोडणार नाही हे सुलीला माहिती होतं.

ह्या पार्टीत सुलीची सत्वपरीक्षा घेतली जाणार होती.

"बोचरे तिला ऐकू येती न येतील असे टोमणे. "नवरा फार पैसे मिळवतोय याचा गर्व होता ना! आता घ्या!"

प्रश्नार्थक चेहेरे! "नवऱ्याचे उघड सेक्रेटरीशी खेळ चाललेत. ही थंडपणे सहन का करून घेते ?त्याच्या पैश्यासाठी का?"

अर्थपूर्ण कटाक्ष! "किती दिवस तू हा अपमान सहन करून घेणार आहेस.?"

सहानुभूती! "इतके दिवस घरी बसली होती आता स्वत:चं पोट कसं भरणार? अलीमोनिवर? दोन डॉक्टरांच्या बायकांच असं झालंय. माझ्यावर ही पाळी आली नाही म्हणजे मिळवलं. या डॉक्टर नवऱ्यांवर बारीक लक्ष ठेवलं पाहिजे."

"सबंध दिवस सुंदर सेक्रेटरी बरोबर घालवणार. शेवटी पुरुषच तो. अफेअर होणारच."

हे सर्व होतच. शिवाय मिकी येऊन "हाय,मिसेस काळे!" म्हणून तिच्या गळ्यात पडणार होती आणि मदन, "हाय,डार्लिंग!" म्हणून तिला जवळ खेचणारच होता. 'प्रेमाचं आणि अगत्याचं' हा नाटकाचा खेळ ती दोघं खेळत होती.

ह्या नाटकाला काळीज घट्ट करून तिला तोंड द्यायचं होतं.

"आता फक्त सहा महिने राहिलेत. रोहित आणि रश्मी कॉलेजात आधीच पोचलेत. सरलाचं हे हायस्कूलच शेवटचं वर्ष. पुढच्या वर्षी ती कॉलेजात जाईल. तो पर्यंत हा शो चालू ठेवायचा. मग मी मोकळी. सुली स्वत:ला समजावत होती.

अमेरिकेला पोचल्याबरोबर तिने भारतातली तिची डिग्री व नोकरी यांची माहिती कॉलेजला दिली होती. आणि अमेरिकेत शिक्षिका होण्याची तयारी सुरु केली होती. चार पाच कोर्सेस पूर्वी ही केले होते. पण मग रोहितचा जन्म झाला. आणि तिचं शिक्षण थांबलं होतं. तो तुटलेला धागा आता तिला परत जोडायचा होता.

सहा महिन्यापूर्वी ती कॉलेजात जायला लागली होती.

सरला तिच्याच जगात रहात होती. तिला कॉलेजच्या अर्जाचे फॉर्म भरायला सुलीने मदत केली होती. सरलाच्या कॉलेज ॲडमिशनची सुली व सरला ह्या दोघी वाट बघत होत्या. सुलीचं कॉलेज चालू होतं. समर संपता संपता तिचे कोर्सेस संपणार होते. ती ग्रॅज्युएट होणार होती. शिक्षिकेची नोकरी शोधायला तिने सुरवात केली होती.

मदन त्याच्याच जगात रहात होता. अजून सुलीला तो घटस्फोटाचं काहीच बोलला नव्हता. सुलीच्या कॉलेज शिक्षणाबद्दल मधून मधून "कसं आहे तुझं नवं वेड?" असे प्रश्न विचारायचा.

दिवस उलटत होते. सरलाने तिचं कॉलेज निवडलं. रोहित व रश्मी समर मध्ये घरी आले होते. ते परत कॉलेजात गेले. दरम्यान सुलीला वुडलंडपासून शंभर मैलावरच्या एका गावात शिक्षिकेची

नोकरी मिळाली. तिने त्या शाळेजवळ दोन बेडरूमचा अपार्टमेंट भाड्याने घेतला. त्यात थोडी भांडी, डिशेश, एक बेड, डेस्क, डायनिंग टेबल असं सामान नेऊन ठेवलं आणि ती लॉयरला भेटली.

ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात सरलाला कॉलेजात पोचवून ती वुडलंडला परतली. "मैत्रिणीकडे जातेय" अशी चिट्ठी लिहून ठेवून तिने एका बॅगेसह घर सोडलं. तेव्हा तिच्या डोळ्यात पाणी नव्हतं.

वाटेत ती लॉयरला भेटली आणि मदनला घटस्फोटाची नोटीस पाठवण्याची व्यवस्था करून आपल्या नव्या घरी गेली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आठ वाजता तिच्या अपार्टमेंटची घंटी वाजली. तिने दरवाजा उघडला. हातात घटस्फोटाची नोटीस घेऊन मदन दरवाज्यात उभा होता. सुली नुसतीच उभी राहिली. मदन आता येऊन लिविंग रूम मधल्या फोल्डिंग खुर्चीवर बसला. त्याने सुलीच्या अपार्टमेंटवर नजर फिरवली. आणि त्याने विचारलं,"सुले, माझ्याशी न बोलताच तू घटस्फोट घ्यायचा ठरवलास?".

"हो ठरवला." सुलीने थंडपणे सांगितलं, "बोलण्याचं कारणच नव्हतं."

"मला घटस्फोट नकोय."

"माझा निर्णय मी बदलणार नाही."

"सुले, हल्ली मिकीशी माझं पटत नाही. आमची भांडण होतात."

"तो तुझा प्रश्न आहे."

"मी तिला सोडून देणार आहे."

"त्याच्याशी मला कर्तव्य नाही".

"सुले आपण एवढ्या प्रेमाने, कष्टाने उभारलेलं आपलं घरटं तू उधळू नकोस. माझ चुकलं हे खरं. मिकीचा मला मोह पडला. तू झालं गेलं विसरून परत ये".

सुली शांतपणे म्हणाली, "मदन तुझे वडील मला मागणी घालायला आले तेव्हा माझी आजी, आईवडील, मोठा भाऊ,हुरळून गेले. माहितीचं सुस्थितीतील कुटुंब. डॉक्टर मुलगा आणि आईच्या भाषेत "नावासारखा मदनाचा पुतळा." पण तू अमेरिकेत जाणार म्हटल्यावर माझे वडील नकार द्यायला उठले होते. "सातासमुद्रापार मुलीला पाठवणार नाही." असं म्हणाले. पण मी तुला बघताच तुझ्या प्रेमात पडले होते. माझ्या हट्टासाठी त्यांनी आपल्या लग्नाला संमती दिली. "सुलीने क्षणभर थांबून दीर्घ निश्वास सोडला." आपलं लग्न झाल्यावर मी स्वत:ला तुला वाहून घेतलं. मला कामाची सवय नव्हती. अमेरिकेत सुरवातीला आपल्याकडे पैसे नव्हते. लगेच दोन मुलं झाली. मी आनंदाने कामाचे घाणे उपसले. मग आपल्याकडे पैसे आले. कष्ट संपले. दिवस आनंदात चालले होते. मग मिकी तुझ्या जीवनात आली. अफवा कानावर येऊ लागल्या. माझ्या जीवश्र्चकंठश्र्च मैत्रिणीने- प्रभीने- तुझ्याविषयी सांगितलं तरी मी तिच्यावर विश्वास ठेवला नाही. मग तुझ्या बॅगेत मला मिकीच्या नावाची रिसीट सापडली आणि माझ्या पायाखालची पृथ्वी दुभंगली."

मदन लक्षपूर्वक सुलीच बोलणं ऐकत होता.

"माझा तुझ्यावर राग नाही. पण तुला मी नकोशी असताना मला तुझ्याकडे राहण्याची इच्छा नाही. माझ्या उर्वरित आयुष्याचं काय करायचं याचा निर्णय मी घेतलाय. तुला तुझा मार्ग मोकळा करून दिलाय. मी माझे माहेरून मिळालेले दागिने आणि कपडे तेव्हढे घेतले आहेत. बाकी सर्व तुझं. मला तुझ्याकडून काही नको. फक्त मुलांच्या कॉलेजची फी तू भर ही विनंती."

थोडा वेळ मदन काहीच बोलला नाही. मग म्हणाला, "सुले मला तू हवीयेस. मिकीला मी कामावरून काढून टाकणार आहे. सुले घटस्फोटाची नोटीस हातात पडताच मी शुद्धीवर आलो. माझं तुझ्यावर किती प्रेम आहे हे मला समजलं."

सुली खिन्नपणे हसली, "मदन मी काय किंवा मिकी काय भावल्या आहोत का? माझ्याशी खेळून कंटाळा आला. मला कपाटात टाकलं आणि थोडे दिवस मिकीशी खेळलास. आता मिकीचा कंटाळा आला. तिला कपाटात टाकलं आणि मला बाहेर काढलं."

मदन अजीजीने म्हणाला,"मी एकावेळी दोन भावल्यांशी खेळत होतो हे खरं. मला वाटलं माझं मिकीबरोबर जे काही चाललं होत ते येवढ उघड उघड चाललं होतं की तुला माहिती असणार. तू काहीतरी म्हणण्याची मी वाट बघत होतो. पण तू काहीच बोलली नाहीस. मला वाटलं------"मदन अडखळला.

"काय वाटलं?" सुलीने विचारलं.

"तू चालवून घेते आहेस. तुझ्याकडे पैसे, घर, दागिने सगळ होतं.म्हणून म्हणून----"-मदन थांबला.

"म्हणून मी चालवून घेतेय?"

मदन म्हणाला, "मला तू जर जाब विचारला असतास तर मी मिकीला सोडून देणार होतो."

सुली म्हणाली, "तुझे हिशोब चुकले मदन. तू खऱ्या सुलीला ओळखलच नाहीस."

सुली उठून उभी राहिली तिने अपार्टमेंटचा दरवाजा उघडून धरला.

मदन अजीजीने म्हणाला, "माझी चूक झाली. सुले, मला क्षमा कर. घरी चल. आपण परत नव्याने सुरवात करू."

सुली जागच्या जागी उभी राहिली. "ते आता शक्य नाही. मी आता परत फिरणार नाही. मला मुलांना फोन करायचे आहेत. तू आता तुझ्या घरी जा."

मदनला वाटलं होतं, "मी मिकीला सोडणार असं आपण सांगताच सुली सरळ आपल्याबरोबर परत येईल. पण हे काय भलतंच घडत होतं." तो म्हणेल ती पूर्व मानणारी सुली बदलली होती. मदन आश्चर्याने आपल्या पत्नीच्या अनोळखी स्वरूपाकडे बघत राहिला!

समाप्त .५.१५

पूर्व प्रसिद्धी रंगदीप.